**सोलापूर महानगरपालिका**
**सभेचा इतिवृत्तांत**
**(मा.सर्वसाधारण सभा संदर्भ)**
**उप-समिती बैठक क्रमांक -३६**

सोलापूर महानगरपालिका, जा.क्र.नआ/वै/९११ मा.आयुक्त कार्यालय दि. ११.०३.२०२२ रोजीच्या मा.प्रशासकसो यांच्या आदेशाने मा.अति.आयुक्त, मा.मुख्यलेखापरिक्षक, नगरसचिव व विषयाशी संबंधित विभागाचे खातेप्रमुख/सहा.आयुक्त, यांची उप-समिती गठीत करणेत आली आहे. सदर प्रस्तावा बाबत प्रशासकीय दप्तरी ठराव करणेकामी मा.उपसमितीचे शिफारसी करिता दि.२८.०७.२०२२ रोजी सायं ५.३० वाजता मा.अति.आयुक्त यांचे कार्यालय येथे बैठक बोलाविणेत आली होती.
सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क. | अधिकारी/ कर्मचारी | हुद्दा |
|---|---|---|
| १ | मा.श्री.विजय खोराटे | अतिरिक्त आयुक्त |
| २ | मा.श्रीमती.रुपाली कोळी | मुख्यलेखापरिक्षक |
| ३ | मा.श्री.प्रविण दंतकाळे | नगरसचिव |
| ४ | मा.श्री.विक्रमसिंह पाटील | सहा.आयुक्त, भू व मा |
| ५ | मा.श्री लक्ष्मण चलवादी | सहा.संचालक नगर रचना |

| अ.क्र | विषय क्रमांक | विषयाचा तपशील | संबंधित खातेप्रमुख / सहा.आयुक्त | मा.प्रशासक यांचेकडे विषया संबंधी निर्णय घेणे कामी उपसमितीची शिफारस |
|---|---|---|---|---|
| १ | ८१ | मौजे मुळेगाव ता.दक्षिण सोलापूर गट क्र.१३ मध्ये १३/१ अ क्षेत्र १ हेक्टर ०७ आहे. यामध्ये कत्तलखाना असून सध्या बंद अवस्थेत आहे. १३/१ ब क्षेत्र २.४७ आहे. सदरचे क्षेत्र मोकळे असून सोमपाच्या मालकीची आहे. सदरची जागा कत्तलखान्यासाठी संपादन झालेली होती. कत्तलखाना बंद असल्याने सदरची जागा मोकळी आपल्या कब्जेत आहे. सदरची जागा मोकळी असल्याने गोडावूनसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे. १३/१/क पैकी २.४७ आर ही सुध्दा मोकळी जागा आहे. सदर जागा कत्तलखान्यासाठी खरेदी केलेली आहे. सदर जागा हद्दीबाहेर असल्याने सदर जागेवर आरक्षण नाही. सदरची जागा मोकळी आहे. प्रकरणी मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा नोट १२ प्रमाणे अभिप्राय जोडलेला आहे. तसेंच दि.०७/०४/२०२२ च्या जा.क्र.२०२२/स.स.न.र./न.रन/४८ या पत्रान्वये सहाय्यक अभियंता नगर रचना विभाग यांचा अभिप्राय प्रकरणी समाविष्ठ आहे. जागेचे आरक्षण विकसीत केले असता मनपास आर्थिक फायदा होऊ शकतो. सदरच्या जागेवरती गोडावून विकसीत करण्याच्या प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेची धोरणात्मक मान्यता आवश्यक आहे. परंतू | सहा.आयुक्त भू व मा | **कत्तल खान्यासाठी आवश्यक असणारी जागा सोडून इतर जागेवर गोडाऊन विकसित करणेसाठी प्रस्तावित प्रमाणे धोरणात्मक मान्यता देण्यात येत आहे.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या मा.उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **धोरणात्मक मान्यतेस्तव** सादर करणेकामी मा.आयुक्त यांचे दि.२६/०७/२०२२ च्या मान्यतेने आलेले प्रकरण. **(ई-६१८९६)** | | |
| २ | ८२ | सोलापूर शहरातील सोलापूर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील स्ट्रिट लाईट पोल्सवर जाहिरात करणेबाबत मक्तेदार वसंत एंटरटेनमेंट यांचेकडून प्रस्तावात नमूद नोट क्र.७२ प्रमाणे काम करून घेणेस, येणाऱ्या खर्चास मान्यता देणेकामी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविणे आवश्यक आहे.<br>तसेच स्ट्रीट लाईट पोल्ससाठी अप्राप्त निविदा करीता २०% कपात केल्यास र.रु.६७०/- प्रती पोल प्रती माह इतका दर निश्चित होऊ शकतो, असे सहा.आयुक्त यांनी प्रस्तावित केले असले तरी र.रु.६७०/- हा दर देखील अधिकचा असल्याने निवीदा येण्याची शक्यता वाटत नाही. यास्तव फेर निविदा काढताना MSRDC च्या दरानुसार काढावी असे इकडील मत आहे असे नमूद आहे प्रकरणी मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या मा.उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **प्रस्तावित प्रमाणेस निर्णयास्तव** सादर करणे कामी मा.आयुक्त यांचे दि.२७/०७/२०२२ ने आलेले प्रकरण **(ई-३४९३९)** | सहा.आयुक्त, भू व मा | अ)<br>मक्तेदार वसंत एंटरटेनमेंट यांचेकडून प्रस्तावात नमूद प्रमाणे वाटाघाटी अंती दिलेल्या दरानूसार प्रस्तावात नमूद ४ ठिकाणचे पोलवरील जाहिरातीचे काम करणेस मान्यता देण्यात येत आहे.<br>ब)<br>तसेच स्ट्रिट लाईट पोलसाठी अप्राप्त निविदासाठी मा.आयुक्त यांनी निविदा प्रसिध्दीसाठी प्रथम दर निश्चित करून निविदा काढावी त्या निविदेस प्रतिसाद न आल्यास पून्हा योग्य ते दर निविदेसाठी निश्चित करणेस मा.आयुक्त यांना अधिकार देण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| ३ | ८३ | पुना नाका ते विजापूर रोड ५४ मि विकास योजना रस्त्याची विद्यमान मनोरमा शाळा ते विजापूर रोड संरेखन (Alignment) मध्ये बदल करून रस्ता मनोरमा शाळा ते (विद्यमान १८ मी रस्ता) प्रस्तावित करणसोटी म.प्रा.व.न.र अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये असलेल्या तरतुदीप्रमाणे फेरबदल कार्यवाही करणेबाबत मा.आयुक्त यांनी आदेश दिलेले आहेत त्यानुसार टिपणीमध्ये नमुद केलेप्रमाणे म.प्रा.व.न.र अधिनियम १९६६ चे कलम | सहा.संचालक नगर रचना | प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस, दैनिक वृत्तपत्रात जाहिर प्रसिध्दीकरणाद्वारे सुचना व हरकती मागविणेस, त्याअनुषंगाने सुनावणी घेणकामी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेकडे मंजूरीस्तव पाठविणे आवश्यक आहे परंतू मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या मा.उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **प्रस्तावित प्रमाणे मंजूरीस्तव** सादर करणे कामी मा.आयुक्त यांचे दि.२८/०७/२०२२ ने आलेले प्रकरण. (ई-६९६८९) | | |

मा.सहा.संचालक,नगर रचना
सोलापूर महानगरपालिका

मा.सहा.आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

मा.मुख्यलेखापरिक्षक
सोलापूर महानगरपालिका

मा.अति.आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

**सोलापूर महानगरपालिका**
**प्रशासक ठराव**
**विषय क्र.८१ ठराव क्र.८१ दिनांक. २८/०७/२०२२**
**(मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )**

८१

मौजे मुळेगाव ता.दक्षिण सोलापूर गट क्र.१३ मध्ये १३/१ अ क्षेत्र १ हेक्टर ०७ आहे. यामध्ये कत्तलखाना असून सध्या बंद अवस्थेत आहे. १३/१ ब क्षेत्र २.४७ आहे. सदरचे क्षेत्र मोकळे असून सोमपाच्या मालकीची आहे. सदरची जागा कत्तलखान्यासाठी संपादन झालेली होती. कत्तलखाना बंद असल्याने सदरची जागा मोकळी आपल्या कब्जेत आहे. सदरची जागा मोकळी असल्याने गोडावूनसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे. १३/१/क पैकी २.४७ आर ही सुध्दा मोकळी जागा आहे. सदर जागा कत्तलखान्यासाठी खरेदी केलेली आहे. सदर जागा हद्दीबाहेर असल्याने सदर जागेवर आरक्षण नाही. सदरची जागा मोकळी आहे. प्रकरणी मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा नोट १२ प्रमाणे अभिप्राय जोडलेला आहे. तसेच दि.०७/०४/२०२२ च्या जा.क्र.२०२२/स.स.न.र./न.रन/४८ या पत्रान्वये सहाय्यक अभियंता नगर रचना विभाग यांचा अभिप्राय प्रकरणी समाविष्ठ आहे. जागेचे आरक्षण विकसीत केले असता मनपास आर्थिक फायदा होऊ शकतो. सदरच्या जागेवरती गोडावून विकसीत करण्याच्या प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेची धोरणात्मक मान्यता आवश्यक आहे. परंतू मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या मा.उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **धोरणात्मक मान्यतेस्तव** सादर करणेकामी मा.आयुक्त यांचे दि.२६/०७/२०२२ च्या मान्यतेने आलेले **प्रकरणी कत्तल खान्यासाठी आवश्यक असणारी जागा सोडून इतर जागेवर गोडाऊन विकसीत करणेसाठी प्रस्तावित प्रमाणे धोरणात्मक मान्यता देण्यात येत आहे.**

**(प्रविण प्रे.दंतकाळे)**
**नगरसचिव**
**सोलापूर महानगरपालिका**

**(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**सोलापूर महानगरपालिका**

सोलापूर महानगरपालिका
मा.प्रशासक कार्यालय

# सोलापूर महानगरपालिका
## प्रशासक ठराव
## विषय क्र.८२ ठराव क्र.८२ दिनांक. २८/०७/२०२२
## (मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )

८२

सोलापूर शहरातील सोलापूर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील स्ट्रिट लाईट पोल्सवर जाहिरात करणेबाबत मक्तेदार वसंत एंटरटेनमेंट यांचेकडून प्रस्तावात नमूद नोट क्र.७२ प्रमाणे काम करून घेणेस, येणाऱ्या खर्चास मान्यता देणेकामी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविणे आवश्यक आहे.

तसेच स्ट्रीट लाईट पोल्ससाठी अप्राप्त निविदा करीता २०% कपात केल्यास र.रु.६७०/- प्रती पोल प्रती माह इतका दर निश्चित होऊ शकतो, असे सहा.आयुक्त यांनी प्रस्तावित केले असले तरी र.रु.६७०/- हा दर देखील अधिकचा असल्याने निवीदा येण्याची शक्यता वाटत नाही. यास्तव फेर निविदा काढताना MSRDC च्या दरानुसार काढावी असे इकडील मत आहे असे नमूद आहे प्रकरणी मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या मा.उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे प्रस्तावित प्रमाणेस निर्णयास्तव सादर करणे कामी मा.आयुक्त यांचे दि.२७/०७/२०२२ ने आलेले **प्रकरणाचे अवलोकन केले**

**अ) मक्तेदार वसंत एंटरटेनमेंट यांचेकडून प्रस्तावात नमूद प्रमाणे वाटाघाटी अंती दिलेल्या दरानूसार प्रस्तावात नमूद ४ ठिकाणचे पोलवरील जाहिरातीचे काम करणेस मान्यता देण्यात येत आहे.**

**ब) तसेच स्ट्रिट लाईट पोलसाठी अप्राप्त निविदासाठी मा.आयुक्त यांनी निविदा प्रसिध्दीसाठी प्रथम दर निश्चित करून निविदा काढावी त्या निविदेस प्रतिसाद न आल्यास पून्हा योग्य ते दर निविदेसाठी निश्चित करणेस मा.आयुक्त यांना अधिकार देण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका मा.प्रशासक कार्यालय

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका

प्रशासक ठराव

विषय क्र.८३ ठराव क्र.८३ दिनांक. २८/०७/२०२२

(मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )

८३

पुना नाका ते विजापूर रोड ५४ मि विकास योजना रस्त्याची विद्यमान मनोरमा शाळा ते विजापूर रोड संरेखन (Alignment) मध्ये बदल करून रस्ता मनोरमा शाळा ते (विद्यमान १८ मी रस्ता) प्रस्तावित करणसोठी म.प्रा.व.न.र अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये असलेल्या तरतुदीप्रमाणे फेरबदल कार्यवाही करणेबाबत मा.आयुक्त यांनी आदेश दिलेले आहेत त्यानुसार टिपणीमध्ये नमुद केलेप्रमाणे म.प्रा.व.न.र अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस, दैनिक वृत्तपत्रात जाहिर प्रसिध्दीकरणाद्वारे सुचना व हरकती मागविणेस, त्याअनुषंगाने सुनावणी घेणकामी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेकडे मंजूरीस्तव पाठविणे आवश्यक आहे परंतू मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या मा.उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **प्रस्तावित प्रमाणे मंजूरीस्तव** सादर करणे कामी मा.आयुक्त यांचे दि.२८/०७/२०२२ ने आलेले **प्रकरणास प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.**

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका मा.प्रशासक कार्यालय

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका